**RNI No. MAHBIL /2009/37831**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष १२, अंक २४]** **मंगळवार, फेब्रुवारी २४, २०२६/फाल्गुन ५, शके १९४७** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ८४**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५.**

No.:MEDD-१४०१०/२/२०२५-MMD(Adhi).— ज्याअर्थी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ ( १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४६ ) (यात यापुढे ज्याचा निदेश “उक्त अधिनियम” असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासकीय अधिसूचना, डॉ. विंकी मोहनलाल रुघवानी, यांची शासनाने अधिसूचना क्र.मवैप-०८२२/प्र.क्र.५०/अधिनियम, दि.२२/०२/२०२४ अन्वये प्रशासक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद या पदी एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा निवडणुकीद्वारे नव्याने परिषद यथोचितरित्या गठित होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नियुक्ती करण्यात आली होती, डॉ. विंकी मोहनलाल रुघवानी, यांनी सदरहू प्रशासक या पदाचा कार्यभार दि.२६/०२/२०२४ पासून स्वीकारला होता. सदरहू नियुक्तीचा मुदतीचा कालावधी दि.२१/०२/२०२५ रोजी संपुष्टात आला होता. या अनुषंगाने अधिसूचना क्र.MEDD-१४०१०/२/२०२५-MMD (Adhi), दि.२१/०२/२०२५ अन्वये महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियमाच्या कलम ३१ (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून डॉ. विंकी मोहनलाल रुघवानी, यांची परिषदेचे सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा निवडणुकीद्वारे नव्याने परिषद यथोचितरित्या गठित होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रशासक म्हणून नियुक्तीस मुदतवाढ दिली होती ;

आणि ज्याअर्थी, प्रशासक डॉ. विंकी रूघवानी यांचा पदावधी दि. २०/०२/२०२६ रोजी संपुष्टात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या प्रशासकीय कामकाजामध्ये सातत्य राखण्याची आवश्यकता व निवडणुका सुरळीत पार पाडण्याची गरज विचारात घेता, डॉ. विंकी रूघवानी यांना परिषदेचे सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून मुदतवाढ देण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविले आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३१ (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन डॉ. विंकी मोहनलाल रुघवानी, माजी उपाध्यक्ष, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई यांची उक्त परिषदेचे सर्व अधिकार व कर्तव्ये पार पाडण्यासाठी एक वर्षांच्या कालावधीसाठी किंवा निवडणुकीद्वारे नव्याने परिषद यथोचितरित्या गठित होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत प्रशासक म्हणून नियुक्तीस मुदतवाढ देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. सुवर्णा सि. खरात,**
शासनाच्या सहसचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

G. T. Hospital Complex, 9th Floor, New Mantralaya, Lokmanya Tilak Road,
Mumbai 400 001, Dated the 24 February, 2026.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA MEDICAL COUNCIL ACT, 1965.

No.: MEDD-14010/2/2025-MMD (Adhi) .— Whereas, by Government Notification, Medical Education and Drugs Department No.MMC-0822/C.R.-50/Act, dated 22.02.2024 issued under section 31 of the Maharashtra Medical Council Act, 1965 (Maharashtra Act No. 46 of 1965) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra has appointed Dr. Vinky Rughwani as the Administrator of the Maharashtra Medical Council. The term of office of the Administrator Dr. Vinky Rughwani was came to an end on 21.02.2025. The appointment of Dr. Vinky Mohanlal Rughwani as Administrator was extended for a period of one year to discharge all the powers and duties of the Council or until a new Council is duly constituted by election, whichever is earlier;

And whereas, the term of office of the Administrator Dr. Vinky Rughwani is coming to an end on 20.02.2026;

And whereas, considering the necessity of maintaining continuity in the administrative work of the Maharashtra Medical Council and the need to smoothly conduct the elections, the Government of Maharashtra has decided to extend the tenure of Dr. Vinky Rughwani as the Administrator to carry out all the powers and duties of the council;

Therefore, now, using the powers conferred by section 31 (1) of the said Act, the Government of Maharashtra is extending the tenure of Dr. Vinky Mohanlal Rughwani, Former Vice President, Maharashtra Medical Council, Mumbai, as the Administrator to carry out all the powers and duties of the said council for a period of one year or until a new council is duly constituted through elections, whichever occurs earlier.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. SUVARNA S. KHARAT,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.